ePaper

**नवनीत राणांना सर्वोच्च न्यायालयाकडून दिलासा, जात प्रमाणपत्र वैध ठरवलं!**



|| वर्ष - 7 । अंक - 316 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 5 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- गुजरातविरूद्ध पंजाबच 'किंग'
- तापसीच्या लग्नाची बातमी खरी
- भारताच्या संरक्षण निर्यातीचा विक्रम
- कारवाई होणार हे मला माहीत होतं


# महापालिकेचा मालमत्ता बिल वाटपांसाठी सिध्दी 2.0 प्रकल्प..!

## गतवर्षीप्रमाणेच बचत गटातील महिलांमार्फत यंदाही बिलाचे होणार वाटप

## » महिला आर्थिक विकास महामंडळाकडे दिली जबाबदारी

। पिंपरी । महाईन्यूज

**शहरात 6 लाख 25 हजार निवासी, व्यावसायिक, औद्योगिकसह इतर मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांना महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने कराची आकारणी केली जाते. गतवर्षी या मालमत्ता धारकांना महिला बचत गटाच्या माध्यातून घरोघरी बिले पोच करण्याचा महत्वाचा निर्णय महापालिकेने घेतला होता. अवघ्या दिड महिन्यात पालिकेच्या इतिहासात प्रथमच 100 टक्के मालमत्ता धारकांना बिले घरपोच मिळाली होती. त्यामुळे आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतच मालमत्ता धारकांनी विविध कर सवलतींचा लाभ घेवून 447 कोटी रूपये म्हणजे 50 टक्के मालमत्ता कर वसूल करण्यात या विभागाला यश आले होते.**



महिला आर्थिक विकास महामंडळाच्या महिलांवर महापालिकेने टाकलेला विश्वास गतवर्षी सार्थ ठरविल्यामुळे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी पुन्हा एकदा मालमत्ता कराच्या बिलांचे वाटप बचत गटातील महिलांकडे सोपविण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पाला सिध्दी 2.0 प्रकल्प असे नाव देण्यात आलेले आहे. या प्रकल्पाचे समन्वयन व पर्यवेक्षण राज्य शासन अंगीकृत महिला आर्थिक विकास महामंडळाकडे सोपविण्यात आले आहे.

**बचत गटातील महिलांना प्रशिक्षण...**

मालमत्ता करांची बिले वाटपासंदर्भात महिलांना कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात 2 एप्रिल रोजी प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी कर संकलन विभागाचे सर्व प्रशासन अधिकारी, सहायक मंडल अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या प्रशिक्षणामध्ये महिलांना मालमत्ता कराविषयी मुलभूत माहिती, बिल नेमके कसे असते, बिलांमध्ये कोण-कोणत्या बाबींचा समावेश असतो, याची इत्थंभुत माहिती देण्यात आली. सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी गतवर्षी राबविलेल्या उपक्रमाचे झालेले फायदे, आलेल्या अडचणी या संदर्भात मार्गदर्शन केले. गतवर्षीच्या अडचणी पुन्हा येऊ नये, यासाठी काय उपाय योजना करण्यात येत आहेत, याचीही चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर प्रत्येक महिलेला दोन हजारपेक्षा जास्त बिले वाटपाचे काम देण्यात येणार नाही. जेणेकरून सर्व महिलांना बिल वाटपाचे मानधनाची रक्कम समान मिळेल.

### एका बिलासाठी महिलांना मिळणार 20 रूपये...

» मालमत्ता कराचे बिल वाटण्यासाठी महापालिकेच्या वतीने महिलांना गतवर्षी एका बिलासाठी 15 रूपये देण्यात आले होते. मात्र, यंदा यामध्ये वाढ करून प्रत्येक बिलासाठी 20 रूपये देण्यात येणार आहेत. यावर्षी देखील सिध्दी ॲपच्या माध्यमातून काम करण्यात येणार आहे. यावेळचे सिध्दी ॲप गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. महिलांनी मालमत्तेचा मोबाईल क्रमांक हा एसएमएस पाठविण्याच्या दृष्टीने व सर्व सेवा ऑनलाइन मिळण्यासाठी अत्यंत महत्वाचा आहे. पालिकेच्या सर्व सेवा ओटीपी बेस असल्यामुळे मालमत्ता धारकाने आपला अचूक मोबाईल नंबर देणे आवश्यक आहे. त्यामुळे यंदा ॲपमधून प्रत्येक मालमत्तेचा मोबाईल क्रमांक ओटीपीव्दारे शहानिशा केला जाणार आहे.

# महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांचे झोकून देऊन काम करा

## » सुनील शेळके: मावळ लोकसभा मतदारसंघाची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची नियोजन बैठक उत्साहात

। वडगाव मावळ । महाईन्यूज । प्रतिनिधी।

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या सूचनांचे पालन करत महायुतीचा धर्म पाळणार असून मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांचे झोकून देऊन काम करण्याचा निर्धार




मावळ तालुका राष्ट्रवादी काँग्रेसने केला आहे.

मावळ लोकसभा मतदारसंघाची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची नियोजन बैठक मावळचे आमदार सुनील शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष बापूसाहेब भेगडे, ज्येष्ठ नेते बबनराव भेगडे, गणेश अप्पा ढोरे, तालुकाध्यक्ष गणेश खांडगे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन घोटकुले तसेच बाबुराव वायकर, विठ्ठल शिंदे, गणेश काकडे तसेच मावळ तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

### कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन

»सुनील शेळके यावेळी म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा अजित पवार यांनी जो काय निर्णय घेतला आहे, त्या निर्णयाचे स्वागत करून या निवडणुकीमध्ये मावळ लोकसभेचे महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या विजयासाठी झोकून देउन काम करण्याचे आवाहन अजित पवार यांनी केले आहे. मावळ तालुका राष्ट्रवादीचे कार्यकर्ते व प्रमुख पदाधिकाऱ्यांनी पूर्ण ताकदीनिशी कामाला लागावे. या नियोजन बैठकीत ज्येष्ठ नेते बबनराव भेगडे, गणेशअप्पा ढोरे, बापूसाहेब भेगडे, तालुकाध्यक्ष गणेश खांडगे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.

# खाद्य संस्कृती जोपासणारे बंट्स बांधव ‘पक्के पुणेकर’!

## » मुरलीधर मोहोळ: 400 पारसाठी विविध संघटनांचा मोहोळ यांना सक्रिय पाठिंबा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे ही सांस्कृतिक राजधानी आहे. हॉटेल व्यवसायाच्या निमित्ताने भारताच्या दक्षिण भागातून बंट्स समाजाबांधव म्हणजे ज्यांना ‘पुणेकर आण्णा’ म्हणून ओळखतो ते पुण्यामुंबईत आले. त्यांनी त्यांचे लक्ष्य फक्त व्यावसायिक म्हणून ठेवले नाही, तर ते पुण्याच्या खाद्य संस्कृतीबरोबरच शहराच्या ऐतिहासिक संस्कृतीशी एकरूप झाल्याने पक्के पुणेकर म्हणून आता त्यांची ओळख झाली आहे.**



राहिला प्रश्न त्यांच्या समस्या, अडचणीचा तर त्या सोडवण्यासाठीच लोकआम्हाला त्यांचे प्रतिनिधी म्हणून निवडून देतात. लोकप्रतिनीधी म्हणून मी माझ्याकडून शंभर टक्के देत त्यांच्या समस्या सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला, अशा भावना भाजप-महायुतीचे पुण्यातील उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केल्या.बंट्स संघ पुणेने आयोजित केलेल्या समाजाच्या मेळाव्यात ते बोलत होते. लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने बंट्स समाजाची भूमिका निश्चित करण्यासाठी बंट्स संघ समाज बांधवांचा मेळावा नुकताच आयोजित केला होता. या मेळाव्याला राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील व पुणे लोकसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ खास निमंत्रित होते.

यामेळाव्याला बंट्स संघ पुणेचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुण्यात बंट्स समाजाची साडेतीन ते चारहजार व्यावसायिक कुटुंब असून ती व्यवसायाच्या निमित्ताने किमान पंधरा हजार कुटुंबांशी थेट जोडले गेलेले आहेत.पुणे शहरात हॉटेल व्यवसायाचे व्यवस्थापन करण्याचे बहुतांश काम बंट्स समाजातील व्यावसायिक करत आहेत. चारशेपेक्षा जास्त खासदारांसह देशात पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली तिस-यांदा सरकार आणण्यासाठीच आमच्याकडून प्रयत्न म्हणून आम्ही मुरलीधरजी मोहोळ यांना पाठिंबा देत आहोत असे अध्यक्ष संतोष शेट्टी यांनी सांगितले. आमच्या व्यवसायाचा प्रामुख्याने महापालिका आणि राज्य शासनाशी संबंध येतो. राज्याचे मंत्री म्हणून चंद्रकांतदादा पाटील आणि महापालिकेत नगरसेवक आंणि नंतर महापौर म्हणून काम करताना मुरलीधर मोहोळ यांनी खूपच चांगला, सक्रिय, सकारात्मक सहयोग आम्हा व्यावसायिकांना दिलेला आहे. लोकसभा निवडणुकीसाठी त्यांना पुण्यातून उमेदवारी मिळाली असून यापुढेही त्यांचे आम्हाल पूर्ण सहकार्य मिळेल, असा विश्वास बंट्स संघाच्या पदाधिका-यांनी व्यक्त करत या निवडणुकीत मोहोळ यांना बंट्स संघातर्फे जाहीर पाठिंबा व्यक्त केला आहे.

### पतित पावन संघटनाही मोहोळ यांच्या पाठिशी

» पतितपावन संघटनेनेही मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारात सक्रिय सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. पतित पावन संघटनेने पंतप्रधान मा.श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत पाठिंबा जाहीर केला आहे. यावेळी शिवाजीराव चव्हाण, जनाभाऊ पेडणेकर, धनंजय क्षीरसागर, विक्रम मराठे, राजाभाऊ शिंदे, स्वप्रिल नाईक, गुरु भाऊ कोळी, संतोष शेंडगे, अशोक परदेशी, प्रवीण झोर, रमेश चलवादी यांच्यासह पदाधिकारी आणि संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी अद्याप सुरू झालेली नसली तरी मतदारांच्यात मात्र निवडणुकीबाबत प्रचंड उत्सुकता तयार होत आहे. त्यामुळेच उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वीच वेगवेगळ्या समाज घटकांकडून आपल्या पसंतीच्या उमेदवारांची निवड करून त्यांना समाजाच्यावतीने पाठिंबा जाहीर करायला सुरूवात झाली आहे. तसेच विविध समाज घटकांचे आणि विविधक्षेत्रात कार्यरत असणा-यांचे मेळावे सध्या शहरात सुरू असून मोहोळ यांना त्यात पाठिंबा देण्यात येत आहे.

# ‘राष्ट्रवादीची पूर्ण ताकद खासदार बारणे यांच्या पाठीशी’

## » राष्ट्रवादीचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांचा विश्वास

।भोसरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळ लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसची पूर्ण ताकद महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या पाठीशी राहील. त्यामुळे बारणे यांचे मताधिक्य दुपटीपेक्षा अधिक वाढेल, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी व्यक्त केला.**




शिवसेना- भाजप- राष्ट्रवादी व मित्र पक्ष महायुतीचे मावळ लोकसभा मतदारसंघातील उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी आज (गुरुवारी) भोसरी येथे अजित गव्हाणे यांच्या कार्यालयास सदिच्छा भेट दिली. गव्हाणे यांनी खासदार बारणे यांचा सत्कार करून त्यांना निवडणुकीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यावेळी शिवसेना व कामगार नेते इरफान सय्यद, माजी नगरसेवक नारायण बहिरवाडे, विजय फुगे, सचिन आवटे, पै. अमर फुगे, राजेंद्र तरस आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे व खासदार बारणे यांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय परिस्थितीचा आढावा घेतला. शिवसेना-भाजप युतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसही सहभागी झाल्याने महायुतीची ताकद मोठ्या प्रमाणात वाढली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आदेशानुसार शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष संघटना खासदार बारणे यांच्या विक्रमी विजयासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करील, असे गव्हाणे म्हणाले.

### विकासाच्या मुद्द्यावर महायुती

» मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजितदादा पवार या तिन्ही प्रमुख नेत्यांनी विकासाच्या मुद्द्यावर ही महायुती केली आहे. त्यामुळे राज्याच्या प्रगतीची घोडदौड वेगाने सुरू आहे. विकासाला अधिक गती देण्यासाठी महायुतीमधील मित्र पक्षांचे सर्व कार्यकर्ते एकदिलाने काम करीत आहेत, ही खूप आनंदाची व समाधानाची बाब आहे, अशा भावना खासदार बारणे यांनी व्यक्त केल्या. प्रचारात अधिक सुसूत्रता आणण्यासाठी लवकरच महायुतीतील मित्र पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेण्याबाबतही यावेळी चर्चा झाली.


# निघोजे बंधाऱ्याला गळती

# पिंपरी-चिंचवडमध्ये पाणी कपातीचे संकट!

## महापालिका आयुक्तांची बैठक : गळती रोखण्यासाठी उपाययोजना करणार

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**इंद्रायणी नदीवरील निघोजे बंधाऱ्याला गळती लागली असून, आंद्रा धरणातून मिळणाऱ्या पाण्यात पुन्हा घट झाली आहे. धरणातून अवघे ४५ दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी शहरासाठी मिळत आहे. ४० एमएलडी पाण्याची तूट निर्माण झाल्याने समाविष्ट गावातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे.**



महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांची पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबर ऑनलाइन बैठक झाली. यामध्ये पाणी पुरवठा सुरळीत करण्यासह निघोजे बंधाऱ्यातून पाण्याची गळती रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची सूचना पाटबंधारे विभागाला केली. शहराला गेल्या सव्वाचार वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. शहरासाठी आंद्रा धरणातून शंभर एमएलडी पाणी राखीव आहे. मावळातील पवना धरणातून ५१०, आंद्रा धरणातून पहिल्या टप्प्यात ८५, तर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी)कडून २० असे ६१५ एमएलडी पाणी शहराला देण्यात येते.

आंद्रा धरणातील पाणी इंद्रायणी नदीत सोडून निघोजे बंधाऱ्यातून दोन पंपाद्वारे उचलले जाते. त्यावर चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया केली जाते. तेथे प्रक्रिया झाल्यानंतर जलवाहिन्यांद्वारे पाणी शहराला वितरित केले जात आहे.

### बंधाऱ्याच्या दुरुस्तीला आचारसंहितेचा अडसर

» निघोजे बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याची मागणी पालिकेकडून पाटबंधारे विभागाकडे केली होती. या बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. आचारसंहिता संपल्यानंतर निविदा प्रक्रिया राबवून दुरुस्ती केली जाईल, असे पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

> **शहरासाठी आंद्रा धरणातून शंभर एमएलडी पाणी राखीव आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून इंद्रायणी नदीवरील निघोजे बंधाऱ्यात पुरेसे पाणी येत नाही. पाणी गळती रोखण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत.**
>
> **–मुख्य अभियंता, पाणी पुरवठा विभाग.**

मात्र, गेल्या दोन दिवसांपासून आंद्रा धरणातून ४५ एमएलडीच पाणी मिळत आहे. त्यामुळे ४० एमएलडी पाण्याची तूट निर्माण झाली आहे.

आंद्रा धरणातून पाणी कमी येत असल्याबाबत पालिकेच्या अधिकाऱ्यांनी पाटबंधारे विभागाशी संपर्क साधून ऑनलाइन बैठक घेतली.

आंद्रा धरणातून पुरेसे पाणी इंद्रायणी नदीत सोडावे, निघोजे येथील बंधाऱ्याची तत्काळ दुरुस्ती करावी, अशा सूचना पालिकेच्या वतीने करण्यात आल्या. निघोजे बंधाऱ्यात पाण्याचा पुरेसा साठा होत नसल्याने दोन पंपांऐवजी एकाच पंपाद्वारे पाणी उपसा केला जात आहे.

# महासाधू मोरया गोसावींचा आर्शिवाद घेऊन संजोग वाघेरे यांचा चिंचवडमध्ये प्रचार..!

## मावळ लोकसभा मतदार संघाच्या चिंचवड गावभेट दौऱ्यास उत्स्फुर्त प्रतिसाद

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी आज गुरुवारी (दि.4 एप्रिल) सायंकाळी 4 वाजता चिंचवड येथील श्रीमन महासाधू श्री मोरया गोसावी मंदिरातून दर्शन घेतले. मोरया गोसावींच्या समाधी मंदिरात आशिर्वाद घेऊन त्यांनी चिंचवडमध्ये मतदारांच्या गाठी भेटी घेत प्रचार केला.**



या दौ-याप्रसंगी स्वराज इंडियाचे अध्यक्ष मानव कांबळे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शहर प्रमुख सचिन भोसले, उपजिल्हा प्रमुख वैशाली मराठे, माजी नगरसेवक अनंत को-हाळे, सागर चिंचवडे, ज्योती निंबाळकर, राहुल भोईर, निखील भोईर, सागर वाघेरे, कविता कोंडे देशमुख, पंचशीला आगळे, नम्रता काळभोर, गौरव चौधरी, संजय पडवळ, सलीम शेख, वैशाली काटकर, अनिता तुतारे, रजनी वाघ, उषाताई आल्हाट, कलावती नानेकर, नाना सोनार, समन्वयक गणेश आहेर, रमेश वाळुंज, बाळासाहेब पडवळ, विभाग प्रमुख सचिन चिंचवडे, संदीप भालके, राजाराम कुदळे, दत्तात्रय चिंचवडे, नंदकुमार डेरे, प्रशांत खुळे, विलास भोईर, बिपिन नानेकर, दिलीप गोते पाटील, प्रकाश येवला, संजय लंके, संभा दौंडकर, राहुल वाघेरे, महेश वाघेरे, दीपक वाघेरे, राम दातीर पाटील, अमोल नानेकर, अमित बोत्रे, प्रणव साखरे, बाळासाहेब वाघेरे, सुभाष वाघेरे, चिंचवड गावातील गोविंदा ग्रुपचे कार्यकर्ते, निखिल भोईर, राहुल भोईर, प्रशांत वाघेरे, अभिजित भापारी, सागर वाघेरे, गणेश वाघेरे, आकाश वाघेरे, प्रवीण माळवी, सुशांत गुजर, केतन जाचक, रामचंद्र पवार, सुरज वाघेरे, अनिकेत वाघेरे, रोहन वाघेरे, सिद्धार्थ वाघेरे, वेंकी शिंदे यांच्यासह शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, काँग्रेस पक्षासह महाविकास आघाडीतील घटक पक्ष व संघटनांचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक, युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद

» चिंचवड गावातील मंगलमुर्ती वाडा मंदिरापासून दर्शन घेऊन सुरु सुरू झालेला गावभेट दौरा काळभैरवनाथ मंदिर, हनुमान मंदिर, राम मंदिर, विठ्ठल मंदिर, गांधीपेठ, भाजी मंडई, पडवळ आळी आणि सुखकर्ता अपार्टमेंट या ठिकाणी उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी मतदारांच्या गाठी-भेटी, प्रचार फेरीच्या माध्यमातून मतदारांशी आपुलकीने संवाद साधला. निघालेल्या या गाव भेट दौऱ्यास नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. ठिकठिकाणी माता-भगिनींकडून संजोग वाघेरे पाटलांचे औक्षण केले जात होते. फटाक्यांची आतषबाजी अन ढोल ताशांच्या गजराने परिसर दणाणून जात होता. संपूर्ण चिंचवड गावातील परिसर भगव्या झेंड्यानी बहरून गेला होता.

# 'इंडिया'तील घटकपक्षांच्या टवाळक्या



भूमिका

**भाजपेतर 'इंडिया' आघाडीतील बिनसलेल्या जागावाटपाच्या राज्यांमध्ये जम्मू-काश्मीरची भर पडली आहे. भाजपविरोधात लढण्यासाठी जम्मू-काश्मीरमधून 'इंडिया'मध्ये दोन पक्ष सामील झाले आहेत. फारूख अब्दुल्ला यांचा नॅशनल कॉन्फरन्स आणि मेहबुबा मुफ्ती यांचा पीडीपी. दिल्लीतील सभेमध्ये अब्दुल्ला आणि मुफ्ती दोन्ही सहभागी झाले होते.**

'इंडिया'तील इतर नेत्यांप्रमाणे भाजपविरोधातील ऐक्याच्या या दोघांनीही आणाभाका घेतल्या होत्या.पण, श्रीनगरला परतल्यावर दोन्ही पक्षांचे सूर अचानक बिनसले. खरेतर लोकसभेच्या जम्मू- काश्मीरमधील पाच जागांवर नॅशनल कॉन्फरन्स, 'पीडीपी' आणि काँग्रेस या 'गुपकर करारा'तील तीनही पक्षांनी एकत्र लढणे अपेक्षित होते. पण आता अब्दुल्ला आणि मुफ्ती यांच्या पक्षांनी एकमेकांपासून काडीमोड घेतला आहे. काश्मीर खोऱ्यातील तीनही जागांवर 'पीडीपी' स्वतंत्रपणे लढेल. '२०१९ मध्ये खोऱ्यातील तीनही जागा आम्ही जिंकल्या तर त्यातील वाटा तुम्हाला का देऊ', असे म्हणत 'पीडीपी'ला नॅशनल कॉन्फरन्सने दूर ढकलले; त्यामुळे 'गुपकरा'चा संसार मोडला आहे. 'अब्दुल्लांचा पक्ष तडजोडीस तयार नसेल तर आम्हाला स्वतंत्रपणे लढण्यासाठी पर्याय उरलेला नाही', असे मुफ्तींचे म्हणणे आहे. जम्मू-काश्मीरमधील भाजपेतर आघाडीतील नव्या रचनेनुसार



नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेस ही आघाडी पाचही जागा लढवेल. जम्मू विभागातील दोन्ही जागा काँग्रेसला देण्यात आल्या आहेत. नॅशनल कॉन्फरन्स खोऱ्यातील तीन जागा लढवेल. पश्चिम बंगाल, केरळ, पंजाबमध्ये 'इंडिया'तील घटक पक्ष एकमेकांविरोधात लढत असून तसेच आता जम्मू-काश्मीरमध्येही झालेले आहे. विसंगती अशी की एकमेकांविरोधात लढणारे हे सगळे पक्ष दिल्लीतील रामलीला मैदानावरील भाजपविरोधी सभेत एकत्र आले होते! दिल्लीत 'इंडिया'तील विद्यार्थ्यांचा जणू शिक्षक नसलेला वर्ग भरला होता, तिथे विद्यार्थ्यांनी म्हणजे 'इंडिया'तील घटक पक्षांच्या नेत्यांनी आवेशात भाषणे केली. वर्ग संपल्यावर विद्यार्थी जशा टवाळक्या करतात, तशा 'इंडिया'तील घटक पक्षांनीही कुरघोडीचे राजकारणाच्या 'टवाळक्या' सुरू केल्या असे म्हणावे लागते. भाजप लोकशाहीवर घाला घालतो, भाजपचे नेते संविधान बदलण्याची भाषा करतात, काँग्रेसची बँक खाती गोठवून टाकली होती, अरविंद केजरीवालांना लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर अटक केली गेली. विरोधकांची इतकी प्रचंड गळचेपी होत असताना आणि भाजप हाच प्रमुख शत्रू असताना 'इंडिया'तील घटक पक्ष आपापल्या राज्यांत जाऊन एकमेकांवरोधात शड्डू ठोकून का उभे आहेत, हा प्रश्न भाजपविरोधी सुज्ञ व्यक्तिला पडू शकतो. 'आम्ही सगळे एकत्र', असे दिल्लीत छातीठोकपणे सांगायचे पण, प. बंगालमध्ये लोकसभेतील काँग्रेसच्या गटनेत्याविरोधात उमेदवार उभा करायचा, ही टवाळखोरी तृणमूल काँग्रेसने केली. महाराष्ट्रात महाविकास आघाडीच्या जागावाटपावर अधिकृतपणे शिक्कामोर्तब करण्याआधीच काँग्रेसच्या पोटात कोपर मारून ठाकरे गटाने सांगली, मुंबई उत्तर-पश्चिम अशा जागांवर उमेदवार जाहीर करून टाकले. दिल्लीत आम आदमी पक्ष व काँग्रेस एकत्र येतात पण, पंजाबमध्ये ते एकमेकांना नकोसे झाले आहेत. 'इंडिया'तील नेत्यांना भाजप खरोखरच नको, त्याविरोधात लढले पाहिजे हेही कळते. पण, या पक्षांत असुरक्षितता इतकी की, त्यांना महाआघाडीतील अन्य पक्षासाठी थोडा देखील राजकीय अवकाश (स्पेस) द्यायचा नाही. दुसऱ्याने आपल्याला कोपर मारून ढकलले तर आपले काय होणार, ही भीती 'इंडिया'तील प्रत्येकाला वाटते. 'इंडिया' नावाच्या वर्गात विद्यार्थ्यांना कोणाचीही कशीही खोडी काढता येते, कोणीच रागावणारे नाही, कोणाचा वचक नाही. काँग्रेस हा सगळ्यांमध्ये मोठा असला तरी सातत्याने नापास होत असल्याने त्याला वर्गात नाईलाजाने बसवे लागले आहे. त्याचे कोणी ऐकत नाही. मग, मास्तर नसलेल्या वर्गात गोंधळाशिवाय काहीही होत नाही. याउलट भाजपच्या वर्गात सगळे मोदी-शहा छडी घेऊन उभे असल्याने शिंदे असोत नाही तर अजित पवार सगळ्यांना मान खाली घालून वावरावे लागते. हिंगाली, वाशिम-यवतमाळ दोन जागा शिंदे गटाला दिल्या असल्या तरी मास्तरांनी 'तुमचा उमेदवार बदला', असा आदेश दिल्यावर त्या आज्ञेचे पालन करावे लागते. या वर्गातील अतिशिस्त बंडाला उद्युक्त करू शकेल हा भाग वेगळा.

## संपादकीय »

### कोणते 'गिन्हाण'?

***निवडणूक रोख्यांद्वारे दानधर्म करणाऱ्या ४५ कंपन्यांपैकी ३३ कंपन्यांनी कमावलेला नफा शून्य रु. अथवा उणे इतका आहे..***

भूक असताना अन्न सेवन केल्यास प्रकृती, नसताना केल्यास विकृती आणि भूक असतानाही आपल्यापेक्षाही अधिक भुकेलेल्यास ते दिल्यास ती संस्कृती", अशा अर्थाचे आचार्य विनोबा भावे यांचे एक वचन आहे. आधार घेतल्यास आपल्या अनेक कंपन्या, उद्योग कसे संस्कृतीचे पाईक, संस्कृतिरक्षक इत्यादी आहेत हे पाहून अभिमानाने छाती फुलून येईल. या संस्कृतिरक्षणाचा साद्यंत तपशील 'द हिंदू' या दैनिकाने गुरुवारी प्रकाशित केला असून ज्यांस ते मुळातून वाचणे शक्य होणार नाही, त्यांच्यासाठी त्या वृत्तान्ताचा हा अन्वयार्थ. कोणतीही व्यक्ती उद्योग वा व्यापारउदीम सुरू करते त्यामागे चार पैसे हाती पडावेत हा उद्देश असतो. त्यात काहीही गैर नाही. या अशा वैयक्तिक आशा-आकांक्षांतूनच स्वत:ची आणि इतरांचीही प्रगती होते. नपेक्षा उगाच 'आहे त्यात समाधान मानणे' वगैरे तत्त्वज्ञानाधारे जगू गेल्यास प्रगती खुंटते. आहे ती स्थिती बदलणे हेच कोणत्याही प्रगतिसाधकाचे उद्दिष्ट असते.

लेह लडाख परिसरात १९७४ साली पर्यटन सुरू झाले त्या वर्षी अवघ्या ५०० पर्यटकांनी या परिसराला भेट दिली. आज ५० वर्षांनंतर २०२३-२४ मध्ये ही संख्या दरवर्षी सात लाखांच्या पलीकडे पोहोचली आहे. मात्र गेल्या पाच वर्षांत लडाखच्या नागरिकांना इतके बेदखल समजले गेले की, या साऱ्यांना अहिंसक मार्गाने लढावे लागले.

# लडाखवासींची लोककेंद्री विकासासाठी हाक

२००९मध्ये प्रदर्शित झालेल्या 'थ्री इडियट्स'मधील रँचो या पात्रामुळे चर्चेत आलेले मॅगसेसे पुरस्कार विजेते सोनम वांगचुक यांनी २७ मार्चपासून २१ दिवस कडाक्याच्या बर्फवृष्टी, थंडीची पर्वा न करता लडाखमधील हुतात्मा स्मारकाजवळच्या मैदानात हजारो समर्थकांसह केवळ मीठ व पाणी घेऊन उपोषण केले. वांगचुक यांच्या या उपोषणानंतर तिथल्या महिला उपोषणास बसल्या. त्यांच्या १० दिवसांच्या उपोषणानंतर तेथील युवक उपोषण करणार आहेत. मग तेथील बौद्ध भिक्खूही या उपोषण सत्याग्रहातसहभागी होतील. हे साखळी उपोषण केवळ लडाखसाठी नसून स्थानिकांना विकासाचा निर्णयाधिकार हवा यासाठी आहे, हे लक्षात घेऊन येत्या ७ एप्रिलला तिथे निघणाऱ्या 'पश्मीना मार्च'मध्ये देशभरातील लोक सहभागी होण्याची शक्यता आहे. जम्मू-काश्मीर राज्याशी जोडल्या गेलेल्या लडाखला आपल्याला स्वतंत्र दर्जा मिळावा, असे अनेक वर्षे वाटत होते. पाच वर्षांपूर्वी



५ ऑगस्ट २०१९ रोजी अनुच्छेद ३७० रद्द करण्यात आल्याने, आपली मागणी मान्य झाली, आता आपल्याला आपला भूभाग, आपली संस्कृती अधिक चांगल्या आणि न्याय्य पद्धतीने जपता येईल, असेही तिथल्या जनतेला वाटत होते. प्रत्यक्षात मात्र अवघ्या ४५ हजार चौरस कि.मी. क्षेत्रफळाच्या आणि पावणेतीन लाख वस्तीच्या या छोटेखानी भूभागाच्या मानेभोवती केंद्राने आपली मूठ करकचून आवळण्यास सुरुवात केल्याची भावना तिथल्या रहिवाशांत निर्माण झाली आहे. विधानसभा नसलेला केंद्रशासित प्रदेश असे स्वरूप केंद्राने बहाल केल्यामुळे लडाखच्या विकासासंबंधीचे सर्व निर्णय दिल्लीच्या नोकरशाहीकरवी होऊ लागले. विधानसभा नसल्यामुळे स्थानिक जनतेला निर्णयात कोणताही अधिकार शिल्लक नाही. या संवेदनशील, आदिवासीबहुल विभागाच्या स्व-शासनासाठी १९९० च्या दशकापासून 'लडाख स्वायत्त पहाडी विकास परिषद' कार्यरत होती. तेथील आरोग्य व्यवस्था, जमिनीचा वापर आदी स्थानिक मुद्द्यांबाबत ही स्वायत्त परिषद निर्णय घेत असे. त्यामुळे स्थानिकांच्या हितास प्राधान्य मिळत असे.उदा.- त्या परिसरात या स्वायत्त परिषदेमार्फत उभे राहिलेले सार्वजनिक रुग्णालय इतके सुसज्ज आहे की, एकही खासगी रुग्णालय तिथे औषधालाही सापडणार नाही! २०१९ च्या केंद्रशासित प्रदेशाच्या दर्जानंतर या स्वायत्त यंत्रणेला डावलण्यात आले. तिला कोणतेही अधिकार उरलेले नाहीत. थोडक्यात केंद्राचे शासन सुरू झाल्यावर लोकशाही अधिकारांचा संकोच, स्थानिक विकासाबाबत निर्णयप्रक्रियेत शून्य सहभाग, पर्यावरणीय असंवेदनशीलता असे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# कारवाई होणार हे मला माहीत होतं

## संजय निरुपम यांनी शिंदेंच्या शिवसेनेत जाण्याचा निर्णय घेतला?

। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवत अखिल भारतीय काँग्रेस समितीने मुंबई काँग्रेसचे माजी अध्यक्ष संजय निरुपम यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. सहा वर्षांसाठी ही कारवाई असल्याचे पक्षाने स्पष्ट केले आहे. तसेच प्रदेश काँग्रेसच्या स्टार प्रचारकांच्या यादीतून त्यांचे नावही काढून टाकण्यात आले आहे. मात्र, संजय निरुपम यांनी वेगळाच दावा केला आहे. आधी मी राजीनामा दिला मग माझ्यावर कारवाई झाली असं ते म्हणाले.**



आज त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना काँग्रेस पक्षावरही टीका केली आहे.संजय निरुपम म्हणाले, “माझ्यावर कारवाई होणार हे मला माहीत होतं. त्यामुळे मी काल (३ एप्रिल) रात्री १० वाजून ४० मिनिटांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना राजीनामा पाठवला. त्यानंतर तत्काळ माझ्यावर कारवाई करण्यात आली. राजीनाम्यातील माझे शब्द, माझ्या भावना पाहून त्यांना वाटलं असेल की हे प्रकरण खूप जास्त होईल. त्यामुळे त्यांनी माझ्यावर कारवाई केली. म्हणजेच ए फोर साईजचा कागद काँग्रेसने बरबाद केला, असं मला वाटतं.”संजय निरुपम यांच्या जवळच्या एका व्यक्तीने इंडियन एक्स्प्रेसला ही माहिती दिली आहे की संजय निरुपम यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन शिंदेंच्या शिवसेनेत जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांना मुंबईतून लोकसभा लढवायची आहे. ती जागा एकनाथ शिंदे हे त्यांना देण्याची शक्यता आहे. दुसरीकडे काँग्रेस पक्षाने त्यांना कारणे दाखवा नोटीस वगैरे काहीही न बजावता थेट त्यांच्यावर हकालपट्टीची कारवाई केली आहे.वायव्य मुंबई मतदारसंघ हा शिवसेनेच्या शिंदे गटाकडे असून, येथून उमेदवारी मिळावी, असा निरुपम यांचा प्रयत्न सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मात्र उमेदवारीबाबत आश्वासन दिले नव्हते. ‘निरुपम यांनी प्रवेश केल्यास त्यांचे स्वागतच आहे. त्यांना वायव्य मुंबईतून उमेदवारी देण्यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे निर्णय घेतील असे शिंदे गटाचे प्रवक्ते आमदार संजय शिरसाट यांनी सांगितले. निरुपम यांनी भाजपमध्ये प्रवेश करण्यासाठीही प्रयत्न सुरू ठेवले आहेत. पण उमेदवारीबाबत त्यांना कोणत्याच पक्षाने आश्वासन दिलेले नाही.एक काळ असाही होता जेव्हा संजय निरुपम हे दोपहर का सामनाचे संपादक होते. त्याच काळात ते शिवसेनेतही होते. मात्र २००५ मध्ये त्यांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र केला. उत्तर भारतीय फेरीवाल्यांचा मुद्दा त्यांनी उचलून धरला होता. २००९ च्या निवडणुकीत त्यांनी मुंबई उत्तर जागेवरुन विजय मिळवला होता. संजय निरुपम हे दोनदा राज्यसभेचे खासदार होते. २००९ ते २०१४ या कालावधीत त्यांनी उत्तर मुंबई लोकसभेचं प्रतिनिधित्व केलं.आज त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना काँग्रेस पक्षावरही टीका केली आहे.संजय निरुपम म्हणाले, “माझ्यावर कारवाई होणार हे मला माहीत होतं. त्यामुळे मी काल (३ एप्रिल) रात्री १० वाजून ४० मिनिटांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना राजीनामा पाठवला.

### आधी मी राजीनामा दिला

राजीनाम्यातील माझे शब्द, माझ्या भावना पाहून त्यांना वाटलं असेल की हे प्रकरण खूप जास्त होईल. त्यामुळे त्यांनी माझ्यावर कारवाई केली. म्हणजेच ए फोर साईजचा कागद काँग्रेसने बरबाद केला, असं मला वाटतं.”संजय निरुपम यांच्या जवळच्या एका व्यक्तीने इंडियन एक्स्प्रेसला ही माहिती दिली आहे की संजय निरुपम यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन शिंदेंच्या शिवसेनेत जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांना मुंबईतून लोकसभा लढवायची आहे. ती जागा एकनाथ शिंदे हे त्यांना देण्याची शक्यता आहे. दुसरीकडे काँग्रेस पक्षाने त्यांना कारणे दाखवा नोटीस वगैरे काहीही न बजावता थेट त्यांच्यावर हकालपट्टीची कारवाई केली आहे.वायव्य मुंबई मतदारसंघ हा शिवसेनेच्या शिंदे गटाकडे असून, येथून उमेदवारी मिळावी, असा निरुपम यांचा प्रयत्न सुरू आहे. ‘निरुपम यांनी प्रवेश केल्यास त्यांचे स्वागतच आहे. त्यांना वायव्य मुंबईतून उमेदवारी देण्यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे निर्णय घेतील असे शिंदे गटाचे प्रवक्ते आमदार संजय शिरसाट यांनी सांगितले.

# ठाकरे गट चंद्रहार पाटलांची उमेदवारी मागे घेणार?

## उमेदवारी मागे घेतली जाणार नाही : खासदार संजय राऊत

। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या अनेक वर्षांपासून काँग्रेस पक्ष सांगली लोकसभेची जागा लढवत आला आहे. परंतु, यंदाच्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीत शिवसेनेच्या ठाकरे गटाने सांगलीच्या जागेवर दावा सांगितला आणि या जागेवर आपला उमेदवारही जाहीर केला.**



महाविकास आघाडीत ठाकरे गटाने कोल्हापूरची जागा काँग्रेससाठी सोडली. काँग्रेसकडून छत्रपती शाहू महाराज दुसरे हे या जागेवरून लोकसभा निवडणूक लढवणार आहेत. त्याबदल्यात शिवसेनेच्या ठाकरे गटाने सांगली लोकसभेची जागा आपल्याकडे घेतली आहे. परंतु, सांगलीतले स्थानिक काँग्रेस नेते तसेच राज्य पातळीवरील काही नेते या निर्णयाच्या विरोधात आहेत.सांगलीच्या जागेवरील आपला हक्क सिद्ध करून ही जागा ठाकरेंच्या शिवसेनेकडून परत मिळवण्यासाठी काँग्रेसच्या जिल्हा आणि प्रदेश पातळीवरील नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

तसेच पलूस-कडेगावचे आमदार आणि सांगलीतले स्थानिक नेते विश्वजीत कदम तसेच विशाल पाटील यांनी गेल्या आठवड्यात २७ मार्च रोजी दिल्लीत वरिष्ठ काँग्रेस नेते के. सी. वेणुगोपाल यांची भेट घेतली. या भेटीत कदम आणि पाटील यांनी सांगलीची जागा काँग्रेसला मिळावी यासाठी काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी प्रयत्न करावेत अशी गळ घातली. विशाल पाटील सांगलीतून लोकसभा निवडणूक लढवण्यास इच्छूक आहेत. त्यांना विश्वजीत कदमांसह स्थानिक काँग्रेस नेत्यांचा पाठिंबादेखील आहे.काँग्रेसने मेरीटवर म्हणजेच गुणवत्तेच्या, गावपातळीवरच्या ताकदीवर उमेदवारी निश्चित करण्याचा आग्रह धरला आहे, धनुष्यातून सुटलेला बाण आणि मातोश्रीवरून दिलेला शब्द मागे घेण्याची परंपरा नसल्याचे सांगत ठाकरे गटानेही सांगलीचा हट्ट कायम ठेवला आहे. यामुळे सांगलीची जागा सेनेकडून सोडवून पुन्हा काँग्रेसकडे खेचून आणण्याची लढाई अगोदर नेत्यांना जिंकावी लागणार आहे. तरच भविष्यातील निवडणुका सुलभ आणि सुकर ठरणार आहेत.

### निवडणुका सुलभ आणि सुकर ठरणार

संजय राऊत म्हणाले, या जागेबाबत आम्ही दिल्लीत काँग्रेस हायकमांडशीदेखील बोललो आहोत. त्या चर्चेनंतर आम्ही स्पष्ट केलं आहे की उमेदवारी मागे घेतली जाणार नाही. किंबहुना मी स्वतः सांगलीला जातोय. शिवसेनेचं मुंबईतलं पथक घेऊन तिकडे जाणार आहे. आमचे सांगलीचे निवडणूक समन्वयक आदित्य शिरोडकर, मी आणि आमची मुंबई-पुण्यातली पथकं सांगलीत ठाण मांडून बसणार आहोत. पुढील चार ते दिवस मी पूर्णवेळ सांगलीत असेन. तिथल्या प्रत्येक विधानसभा मतदारसंघात जाणार आहे.

# अरविंद केजरीवालांचा तुरुंगातून संदेश

## दिल्लीत राहणारे दोन कोटी नागरिक माझं कुटुंब : केजरीवाल

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्ली सरकारच्या कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक केली आहे. ते सध्या तिहार तुरुंगात आहेत. तुरुंगात त्यांची प्रकृती खालावली असल्याचं आम आदमी पार्टीच्या नेत्यांनी सांगितलं आहे. ईडीने २१ मार्च रोजी केजरीवाल यांना अटक केल्यापासून आतापर्यंत त्यांचं ४.५ किलो वजन घटलं आहे. केजरीवाल यांना मधुमेहाचा त्रास आहे. त्यातच त्यांचं वजन झपाट्याने कमी होत असल्यामुळे आप नेत्यांनी चिंता व्यक्त केली आहे. दुसऱ्या बाजूला तिहार तुरुंग प्रशासनाने म्हटलं आहे की, केजरीवाल यांची प्रकृती उत्तम आहे. तुरुंगातील कैद्यांसाठी असलेल्या वैद्यकीय पथकातील डॉक्टरांनी केजरीवालांच्या तब्येतीबाबत कोणतीही चिंता व्यक्त केलेली नाही.**




आम आदमी पार्टीचे नेते आणि दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त करत असतानाच केजरीवाल यांनी आपच्या सर्व आमदारांसाठी एक संदेश पाठवला आहे. केजरीवाल यांनी त्यांच्या पत्नी सुनीता केजरीवाल यांच्यामार्फत हा संदेश पाठवला आहे. सुनीता केजरीवाल यांनी काही वेळापूर्वी फेसबूक लाईव्ह करून हा संदेश आमदारांसह दिल्लीकरांबरोबर शेअर केला आहे.सुनीता केजरीवाल म्हणाल्या, अरविंद केजरीवाल यांनी आम आदमी पार्टीच्या सर्व आमदारांसाठी तुरुंगातून एक संदेश पाठवला आहे. ते म्हणाले, मी तुरुंगात आहे म्हणून माझ्या कोणत्याही दिल्लीकराला कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची काळजी घ्या. प्रत्येक आमदाराने आपापल्या मतदारसंघाचा दौरा करावा आणि लोकांना काही अडचणी आहेत का ते जाणून घ्यावं. मी केवळ शासकीय कामांबाबत बोलत नाहीये, लोकांच्या इतरही समस्या असतात, ज्या आपण सोडवायला हव्यात. दिल्लीत राहणारे दोन कोटी नागरिक हे माझं कुटुंब आहे आणि माझ्या कुटुंबातील व्यक्ती कोणत्याही कारणामुळे दुःखी असलेली मला चालणार नाही. ईश्वर सर्वांचं भलं करो.आम आदमी पार्टीने बुधवारी (३ एप्रिल) एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की, अरविंद केजरीवाल यांना मधुमेहाची गंभीर समस्या आहे. त्यांची प्रकृती बरी नसूनही ते २४ तास देशाची सेवा करत असतात. अटकेनंतर आतापर्यंत त्यांचं ४.५ किलो वजन घटलं आहे. भाजपाने त्यांचं आरोग्य अधिक धोक्यात टाकलं आहे. अरविंद केजरीवाल यांना काही झालं तर भाजपाला आपला देशच नव्हे तर देवही माफ करणार नाही. केजरीवाल यांना 'ईडी'ने २१ मार्च रोजी अटक केली होती व ते 'ईडी'च्या कोठडीत असताना केजरीवालांनी अटकेविरोधात दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. मात्र, न्यायालयाने तातडीने निकाल देण्यास नकार दिला. तोपर्यंत राऊस जिल्हा न्यायालयाने केजरीवालांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी दिल्यामुळे केजरीवालांची रवानगी तिहार तुरुंगात झाली आहे. त्यामुळे उच्च न्यायालयातील सुनावणीवेळी केजरीवाल उपस्थित नव्हते.निवडणूक लढवण्याची प्रत्येकाला समान संधी मिळाली पाहिजे, खुल्या आणि निष्पक्ष निवडणुकांचा हा अविभाज्य घटक आहे, असा मुद्दा उपस्थित करत सिंघवी यांनी, केजरीवाल यांना लोकसभा निवडणुकीआधी अटक करण्यामागील हेतूंवर शंका घेतली. केजरीवालांना अटक करण्याची निकड काय आहे? मी राजकारणाबद्दल बोलत नाही तर, कायद्याबद्दल बोलत आहे.

### भाजपची मानहानीची नोटीस

» अटक करणे म्हणजे मतदानापूर्वीच 'आप'ला संपुष्टात आणणे, असा युक्तिवाद सिंघवी यांनी केला. नऊ वेळा नोटीस बजावूनही केजरीवाल चौकशीसाठी आले नाहीत, त्यामुळे त्यांना जामीन देऊन ते सहकार्य करतील याची हमी देता येत नाही. त्याआधारावर केजरीवालांना जामीन देण्यास 'ईडी'ने विरोध केला. मात्र, हा पूर्वग्रह आहे. केजरीवाल पळून जाण्याची शक्यता नाही. त्यांनी दीड वर्षांत कोणत्याही साक्षीदारावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केलेला नाही. त्यांनी चौकशीस नकार दिलेला नाही. मग, त्यांच्या जामिनाला विरोध कशासाठी केला जात आहे, असा प्रश्न सिंघवी यांनी उपस्थित केला.'आप'च्या काही मालमत्ता जप्त करायच्या असल्या तरी निवडणुकीच्या काळात ही कारवाई केली तर आमच्यावर आरोप केले जातील. कारवाई केली नाही तर पुरावा कुठे आहे, असा प्रश्न विचारला जाईल. दोन्ही बाजूने आमच्यावर संशय घेतला जाईल. केजरीवाल यांचा या प्रकरणात सहभाग असून पैशाच्या देवाणघेवाणीचे पुरावे मिळाले आहे, असा मुद्दा 'ईडी'च्या वतीने अतिरिक्त महाधिवक्ता राजू यांनी मांडला. मुख्यमंत्री आहात म्हणून अटक करायची नाही असे होऊ शकत नाही. तुम्ही देश लुटाल, पण निवडणुका आहेत म्हणून तुम्हाला कोणी अटक करायची नाही असे कसे चालेल.

# भारताच्या संरक्षण निर्यातीचा विक्रम

## इतिहासात प्रथमच पार केला 21 हजार कोटींचा टप्पा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संरक्षण क्षेत्रासाठी आनंदाची बातमी आहे. इतिहासात प्रथमच भारतीय संरक्षण क्षेत्रानं विक्रमी निर्यात केलीय. मागील आर्थिक वर्षीच्या तुलनेत यावर्षी संरक्षण निर्यातीत 32.5 टक्क्यांची वाढ झालीय. भारताने प्रथमच 21 हजार कोटींचा टप्पा पार केला आहे. यात खाजगी क्षेत्राचे योगदान 60 टक्के, तर संरक्षण क्षेत्रातील सार्वजनिक उपक्रमांचे योगदान 40 टक्के आहे.**

ही वृद्धी भारतीय संरक्षण उत्पादने आणि तंत्रज्ञानाच्या जागतिक मान्यतेचे प्रतिबिंब आहे. देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी ट्वीटरवर संरक्षण निर्यातीच्या संदर्भातील माहिती दिली आहे. हा नवा टप्पा पार केल्याबद्दल त्यांनी सर्व संबंधितांचे अभिनंदन केलं आहे.आर्थिक वर्ष 2023-24 मध्ये संरक्षण निर्यातीने विक्रमी 21,083 कोटी ( सुमारे 2.63 अब्ज अमेरिकन डॉलर्स) रुपयांचा उच्चांक गाठला आहे. जी गेल्या आर्थिक वर्षातील 15,920 कोटी रुपयांच्या संरक्षण निर्यातीच्या तुलनेत 32.5 टक्क्यांनी अधिक आहे. आर्थिक वर्ष 2013-14 च्या तुलनेत गेल्या 10 वर्षांत संरक्षण निर्यात 31 पटीने वाढल्याचे या ताज्या आकडेवारीवरून दिसून



आले आहे. संरक्षण उद्योग, संरक्षण क्षेत्रातील खासगी कंपन्या आणि सार्वजनिक उपक्रमांनी सर्वोच्च संरक्षण निर्यात साध्य करण्यासाठी प्रचंड प्रयत्न केले आहेत. या आकडेवारीत खासगी क्षेत्र आणि संरक्षण क्षेत्रातील सार्वजनिक उपक्रमांचे योगदान अनुक्रमे 60 टक्के आणि 40 टक्के आहे.आर्थिक वर्ष 2023-24 मध्ये संरक्षण निर्यातदारांना जारी करण्यात आलेल्या निर्यात परवान्यांच्या संख्येतही वाढ झाली आहे. आर्थिक वर्ष 2022-23 मधील 1,414 निर्यात परवान्यांच्या तुलनेत 2023-24 मध्ये ही संख्या 1,507 वर पोहोचली आहे. दोन दशकांची तुलनात्मक आकडेवारी म्हणजे 2004-05 ते 2013-14 आणि 2014-15 ते 2023-24 या कालावधीत संरक्षण निर्यातीत 21 पट वाढ झाल्याचे दिसून येते. 2004-05 ते 2013-14 या कालावधीत एकूण संरक्षण निर्यात 4,312 कोटी रुपये होती. जी 2014-15 ते 2023-24 या कालावधीत 88,319 कोटी रुपयांवर पोहोचली आहे.

### संरक्षण निर्यातीत 31 पटीनं वाढ

» राजनाथ सिंह यांनी संरक्षण क्षेत्रातील निर्यातीसंदर्भात माहिती दिलीय. भारताच्या संरक्षण क्षेत्रानं अभूतपूर्व उंची गाठली आहे. यामध्ये नवीन विक्रम केल्याचे राजनाथ सिंह म्हणाले. स्वतंत्र भारताच्या इतिहासात प्रथमच भारताने संरक्षण निर्यातीत 21000 कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. 2023-24 या आर्थिक वर्षात भारताची संरक्षण निर्यात 21,083 कोटी रुपयांच्या पातळीवर पोहोचली आहे. मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत निर्यातीत वाढ झाली आहे. ही वाढ 32.5 टक्क्यांची एवढी मजबूत आहे. इतिहासात प्रथमच भारतीय संरक्षण क्षेत्रानं विक्रमी निर्यात केलीय.

# मी खरेदी केलेली संपत्ती माझ्याच नावावर



सिनेसृष्टीतील दिग्गज अभिनेत्री शर्मिला टागोर यांनी आपल्या संपत्तीबाबत माहिती दिली आहे. लहान वयातच पैसे कमवायला सुरुवात करणाऱ्या शर्मिला यांनी सांगितलं की त्यांनी जेवढी संपत्ती खरेदी केली ती कुठे आहे याची माहिती दिवंगत पती मन्सूर अली खान (टायगर) पतौडी यांना होती. पण स्वतःच्या पैशाने खरेदी केलेली सर्व मालमत्ता माझ्या नावावर आहे, असं त्या म्हणाल्या. आपण विकत घेतलेली कोणतीच संपत्ती पतीच्या नावावर नाही, सर्व स्वतःच्याच नावाने घेतल्याचा खुलासा एका मुलाखतीत शर्मिला यांनी केला. “मी जे काही विकत घेतलं, माझी संपत्ती जसं की घर, कार किंवा कोणतीही वस्तू, दागिने...ते सगळं आधीपासूनच माझ्या नावावर आहे. मी ते पतीबरोबर शेअर केलं नाही, माझी संपत्ती माझ्या पतीच्या नावाने नाही. तसेच टायगरने जे काही घेतलं ते त्याच्या नावावर आहे आणि त्याबद्दल त्याने मृत्यूपत्र बनवून ठेवलेलं आहे,” असं त्या म्हणाल्या.इस्लाममध्ये मृत्यूपत्र बनवण्याची परवानगी नाही, असा दावा शर्मिला टागोर यांनी केला. “इस्लाममध्ये मृत्यूपत्र करण्याची परवानगी नाही, पण आम्हाला असं करावं लागलं. इस्लामनुसार, तुम्ही तुमची संपत्ती दुसऱ्यांना देऊ शकता, पण तुमच्या वारसांना देऊ शकत नाही. संपत्तीचा २५%, ५०% वाटा असं काहीतरी आहे, त्यामुळे ते समजून घेणं गरजेचं होतं. आमच्याकडे खूप जमीन आहे, त्यामुळे ती कोणाच्या नावावर करायची, याचा विचार करणंही आवश्यक होतं. मला तीन मुलं आहेत. त्यामुळे सर्व काही नियमानुसार करावं लागेल,” असं त्या म्हणाल्या.

# विनयभंगाच्या सीनआधी खूप रडली होती माधुरी



ज्येष्ठ अभिनेते रणजीत यांनी त्यांच्या करिअरमध्ये अनेक चित्रपटांमध्ये खलनायकाच्या भूमिका केल्या. बॉलीवूडमधील सुप्रसिद्ध खलनायक रणजीत यांनी एका मुलाखतीत माधुरी दीक्षितबरोबर शूटिंगची एक आठवण सांगितली आहे. ‘प्रेम प्रतिज्ञा’ चित्रपटात विनयभंगाचा एक सीन शूट करायचा होता, पण तो सीन करण्याआधी माधुरी खूप रडली होती, असं ते म्हणाले. ‘एएनआय’ला दिलेल्या मुलाखतीत रणजीत म्हणाले, “ती (माधुरी दीक्षित) रडू लागली आणि सीन करण्यास नकार दिला. मला परिस्थितीची कल्पना नव्हती. मला काही कला दिग्दर्शकांनी याबद्दल सांगितलं होतं. त्यातला एक बंगाली होता. आमचे दिग्दर्शक बापू होते आणि ते दक्षिण भारतीय होते. मी सेटवर मजा करायचो ‘डार्लिंग थोडं तिकडे बघ, मी कपडे बदलतो,’ असं सह-कलाकारांना म्हणायचो. मला तर मेकअप रुममध्ये जायचीही सवय नव्हती. मी तसाच होतो आणि मला तसंच स्वीकारलं गेलं.”विनयभंगाचा सीन हातगाडीवर होणार होता आणि ते माधुरीची वाट पाहत होते, असं त्यांनी सांगितलं. “तिचं रडणं चालूच होतं, मला दुसऱ्या शूटला जायचं होतं आणि मी त्यांना माधुरीला बोलवायला सांगितलं. पण माधुरी या सीनसाठी तयार नसल्याचं मला कुणीच सांगितलं नाही. शेवटी तिने होकार दिला. वीरू देवगण फाइट मास्टर होते. ते म्हणाले ‘आम्ही कॅमेरा फिरवत राहू, सीन मध्येच कट व्हायला नको.’ विनयभंग हा आमच्या कामाचा भाग आहे. खलनायक खऱ्या आयुष्यात वाईट नसतो,” असं रणजीत म्हणाले. चित्रपटातील असे जबरदस्तीचे, विनयभंगाचे सीन खूप काळजीपूर्वक शूट केले जायचे. बऱ्याचदा अशा सीनमध्ये मी दुरुस्त्या सुचवायचो आणि दिग्दर्शक ते मान्य करायचे, असंही रणजीत यांनी या मुलाखतीत सांगितलं.ज्येष्ठ अभिनेते रणजीत यांनी त्यांच्या करिअरमध्ये अनेक चित्रपटांमध्ये खलनायकाच्या भूमिका केल्या.

# तापसीच्या लग्नाची बातमी खरी

बॉलीवूड अभिनेत्री तापसी पन्नू बॉयफ्रेंड मॅथियस बोबरोबर काही दिवसांपूर्वी लग्नबंधनात अडकली. मित्रपरिवार आणि कुटुंबासमवेत दोघांनी गुपचूप लग्नसोहळा उरकला. सध्या इंटरनेटवर तापसीच्या लग्नाचीच चर्चा सुरू आहे. परंतु, तापसीनं यावर अद्याप काही भाष्य केलेलं नाही. अशातच अभिनेत्रीच्या लग्नातला व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हारल होतोय. यावरून तापसीच्या लग्नाची बातमी खरी ठरली आणि चाहत्यांचा आनंद द्विगुणित झाला असं म्हणायला हरकत नाही. लग्नानंतर तापसी पन्नूने पहिल्यांदाच मुलाखत दिली आहे. नुकत्याच एलेला दिलेल्या मुलाखतीत तापसी म्हणाली, “या क्षणी मला वाटतं की, माझ्या व्यावसायिक निवडी मोठ्या प्रमाणात माझ्या वेळेच्या मूल्यावर आधारित आहेत. मला खात्री करून घ्यायची आहे की, एखादा प्रोजेक्ट घेऊन मी माझा वेळ सत्कारणी लावत आहे की नाही. कारण कामाच्या पलीकडे जाऊन त्याचा मला आनंद घ्यायचा आहे. मला आजपासून माझ्या फिल्मोग्राफीची आवड जपायची आहे, म्हणून मला अशा कोणत्याही गोष्टीत वेळ वाया घालवायचा नाही, जिथे तो वेळ सत्कारणी लागत नसेल.



# कपड्यांवर वायफळ खर्च करणं व्यर्थ

‘सिता रामम’, ‘हाय नन्ना’ अशा चित्रपटांतून आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणारी मृणाल ठाकूर ही आताच्या घडीची लोकप्रिय अभिनेत्री आहे. बॉलिवूडमध्येही मृणालने स्वतःचं एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे. ‘फॅमिली स्टार’ या आगामी चित्रपटातह मृणाल विजय देवरकोंडासह झळकणार आहे. नुकत्याच झालेल्या एका मुलाखतीत कपड्यांवर वायफळ खर्च करणं हे तिला व्यर्थ वाटत असल्याचं तिने म्हटलं आहे. ‘गलाटा प्लस’ला दिलेल्या मुलाखतीत मृणाल म्हणाली, “डिझायनर कपड्यांवर मला जास्त पैसे खर्च करायला आवडत नाहीत. कारण- जर ट्रेंड गेला तर ते पुन्हा वापरता येत नाहीत. तुम्ही ते परत घालणार नाही. “मुलाखतीत घातलेल्या कपड्यांबद्दल विचारलं असता मृणाल म्हणाली, “हे माझे कपडे नाहीत. मी यांचा वापर फक्त प्रमोशन्ससाठी करते. या टॉपसाठी जास्तीत जास्त मी २ हजार रुपये खर्च केले आहेत आणि तेही मला जास्त वाटत आहेत.”

# ऑस्करच्या अधिकृत पेजवर झळकली दीपिका पदुकोण!

“दीपिका पुदकोण ‘बाजीराव मस्तानी’ चित्रपटातील “दीवानी मस्तानी...” या गाण्यावर परफॉर्म करत असून श्रेया घोषालने हे गाणं गायलं आहे.”, असं कॅप्शन देत ऑस्करने अभिनेत्रीचा हा खास व्हिडीओ शेअर केला आहे. दीपिकाने हा व्हिडीओ तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर रिशेअर देखील केला आहे. ऑस्करने शेअर केलेल्या व्हिडीओवर तिचा पती व बॉलीवूड अभिनेता रणवीर सिंहने खास कमेंट



करत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. “मेस्मेरिक...” असं त्याने हा व्हिडीओ पाहून म्हटलं आहे. यामध्ये दीपिकाने मस्तानी, तर रणवीरने बाजीराव पेशवे यांची भूमिका साकारली होती.दरम्यान, दीपिका पदुकोणच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर लवकरच ती रोहित शेट्टीच्या ‘सिंघम अगेन’ आणि प्रभासबरोबर एका नव्या चित्रपटात झळकणार आहे.

# सूर्यकुमार यादव मुंबईच्या ताफ्यात दाखल!

## तंदुरुस्तीच्या चाचणीत जवळपास सर्व निकष पूर्ण केले

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**जागतिक ट्रेन्टी-20 क्रमवारीत अग्रस्थानी असणाऱ्या सूर्यकुमार यादवने राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत (एनसीए) तंदुरुस्तीच्या चाचणीत जवळपास सर्व निकष पूर्ण केले आहेत. याबाबत काल (03 एप्रिल) माहिती समोर आली होती. आज सूर्यकुमारची आणखी एक चाचणी झाली. यामध्ये सूर्यकुमार यादव पुर्णपणे तंदुरुस्त असून तो उद्याच मुंबई इंडियन्सच्या ताफ्यात दाखल होणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे 7 एप्रिलला दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यात सूर्यकुमार खेळू शकतो. सूर्यकुमारने आपला अखेरचा सामना दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ट्रेन्टी-20 मालिकेत खेळला होता.**



### मुंबईचा संघ तळाशी

मुंबई इंडियन्सचा कॅप्टन हार्दिक पांड्या याचं देखील सूर्यकुमार यादवच्या कमबॅकमुळं टेन्शन मिटणार आहे. सूर्यकुमार यादव मुंबई इंडियन्सकडून चौथ्या किंवा पाचव्या स्थानावर बॅटिंग करतो. तो संघात नसल्यानं हार्दिक पांड्याला वरच्या क्रमांकावर फलंदाजीला यावं लागत होतं. ती समस्या आता दूर होऊ शकते. मुंबईला गुजरात टायटन्स विरुद्धच्या मॅचमध्ये 6 धावांनी पराभव स्वीकारावा लागला होता. सूर्यकुमार यादव संघात परतल्यानं हार्दिक पांड्याला दिलासा मिळणार आहे. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वात मुंबई इंडियन्सला आतापर्यंत एकही विजय नोंदवता आला नाही. तिन्ही सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. गुणतालिकेत मुंबईचा संघ दहाव्या क्रमांकावर पोहचला आहे.

मुंबई इंडियन्सचा कॅप्टन हार्दिक पांड्या याचं देखील सूर्यकुमार यादवच्या कमबॅकमुळं टेन्शन मिटणार आहे. सूर्यकुमार यादव मुंबई इंडियन्सकडून चौथ्या किंवा पाचव्या स्थानावर बॅटिंग करतो. तो संघात नसल्यानं हार्दिक पांड्याला वरच्या क्रमांकावर फलंदाजीला यावं लागत होतं. ती समस्या आता दूर होऊ शकते. मुंबईला गुजरात टायटन्स विरुद्धच्या मॅचमध्ये 6 धावांनी पराभव स्वीकारावा लागला होता. सूर्यकुमार यादव संघात परतल्यानं हार्दिक पांड्याला दिलासा मिळणार आहे. मुंबई इंडियन्सला गुजरात टायटन्स, सनरायजर्स हैदराबाद आणि राजस्थान रॉयल्स विरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला होता. आता सूर्यकुमार यादवसारखा मिस्टर 360 अशी ओळख असलेला हुकमी एक्का संघात परतल्यानं मुंबई दिल्ली कॅपिटल्स विरुद्धच्या मॅचमध्ये पहिला विजय मिळवणार का हे पाहावं लागेल. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वात मुंबई इंडियन्सला आतापर्यंत एकही विजय नोंदवता आला नाही. तिन्ही सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. गुणतालिकेत मुंबईचा संघ दहाव्या क्रमांकावर पोहचला आहे. मुंबई हा एकमेव असा संघ आहे, ज्याला अद्याप एकही विजय नोंदवता आला नाही. जागतिक ट्रेन्टी-20 क्रमवारीत अग्रस्थानी असणाऱ्या सूर्यकुमार यादवने राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत (एनसीए) तंदुरुस्तीच्या चाचणीत जवळपास सर्व निकष पूर्ण केले आहेत. याबाबत काल (03 एप्रिल) माहिती समोर आली होती. आज सूर्यकुमारची आणखी एक चाचणी झाली. यामध्ये सूर्यकुमार यादव पुर्णपणे तंदुरुस्त असून तो उद्याच मुंबई इंडियन्सच्या ताफ्यात दाखल होणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे 7 एप्रिलला दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यात सूर्यकुमार खेळू शकतो. सूर्यकुमारने आपला अखेरचा सामना दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ट्वेन्टी-20 मालिकेत खेळला होता. मुंबई इंडियन्सचा कॅप्टन हार्दिक पांड्या याचं देखील सूर्यकुमार यादवच्या कमबॅकमुळं टेन्शन मिटणार आहे. सूर्यकुमार यादव मुंबई इंडियन्सकडून चौथ्या किंवा पाचव्या स्थानावर बॅटिंग करतो. तो संघात नसल्यानं हार्दिक पांड्याला वरच्या क्रमांकावर फलंदाजीला यावं लागत होतं. ती समस्या आता दूर होऊ शकते. मुंबईला गुजरात टायटन्स विरुद्धच्या मॅचमध्ये 6 धावांनी पराभव स्वीकारावा लागला होता. सूर्यकुमार यादवने आपल्या कारकिर्दीत आतापर्यंत 139 आयपीएल सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्याने 124 डावांमध्ये 31.85 च्या सरासरीने आणि 143.32 च्या स्ट्राइक रेटने 3249 धावा केल्या आहेत. या कालावधीत त्याने 1 शतक आणि 21 अर्धशतके झळकावली आहेत, ज्यामध्ये सर्वोच्च धावसंख्या 103 धावा आहे.

# गुजरातविरूद्ध अतितटीच्या सामन्यात पंजाबच 'किंग'

## शशांक सिंहच्या वादळी खेळीच्या जोरावर पंजाबची गुजरातवर मात

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**शशांक सिंहच्या ६२ धावांच्या विस्फोटक खेळीच्या जोरावर पंजाब किंग्सने शानदार विजय मिळवला. इम्पॅक्ट प्लेअर आशुतोष शर्मा आणि शशांक सिंह यांनी डेथ ओव्हर्समध्ये वादळी फलंदाजी करत संघाला ३ विकेट्सने विजय मिळवून दिला. पंजाब किंग्जने १ चेंडू बाकी ठेवत लक्ष्य गाठले आणि सामना ३ गडी राखून जिंकला. गुजरातने दिलेल्या २०० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पंजाब संघाची सुरुवात चांगली झाली नसली तरी शशांक सिंह आणि इम्पॅक्ट प्लेअर आशुतोष शर्मा यांनी संघाच्या विजयात मोठी भूमिका बजावली.**




पंजाब किंग्जची १५० धावांवर आपली ६वी विकेट गमावली. यष्टिरक्षक जितेश शर्माने ८ चेंडूत २ षटकारांच्या मदतीने १६ धावा केल्या, पण तो मैदानात फार काळ टिकू शकला नाही. इम्पॅक्ट खेळाडू आशुतोष शर्माही शेवटच्या षटकात झेलबाद झाला. त्याने १७ चेंडूत ३१ धावांची महत्त्वपूर्ण खेळी खेळली. आशुतोष आणि शशांक सिंगमध्ये ७व्या विकेटसाठी २२ चेंडूत ४३ धावांची भागीदारी केली, ज्यामुळे सामन्याला एक वेगळे वळण मिळाले. आशुतोष बाद झाल्यानंतर शशांक सिंगने संघाला विजय मिळवून देत माघारी परतला.२०० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पंजाब किंग्जची सुरुवात खराब झाली. कर्णधार शिखर धवन काही विशेष करू शकला नाही आणि १ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. दुसऱ्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर उमेश यादवने धवनला क्लीन बोल्ड केले. पॉवरप्लेच्या शेवटच्या षटकात पंजाब किंग्जने दुसरी विकेट गमावली. नूर अहमदने जॉनी बेअरस्टोला क्लीन बोल्ड केले. त्याने बाद होण्यापूर्वी बेअरस्टोने १३ चेंडूत २२ धावा केल्या. प्रभसिमरन सिंग आणि सॅम करन यांनी तिसऱ्या विकेटसाठी १६ धावांची भागीदारी केली. नूर अहमदने प्रभसिमरनला मोहित शर्माकरवी झेलबाद केले. सिमरनने २४ चेंडूत ३५ धावा केल्या. पुढच्याच षटकात अजमतुल्ला ओमरझाईने सॅम करनची विकेट घेतली. सिकंदर रझा आणि शशाक सिंग यांनी ५व्या विकेटसाठी चांगली भागीदारी रचत होते पण मोहित शर्माने सिकंदर रझाला बाद केले. रझाने १६ चेंडूत १५ धावा केल्या.तत्पूर्वी पंजाब किंग्स संघाने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. गुजरातने २० षटकांत १९९ धावा केल्या. कर्णधार शुभमन गिलने ४८ चेंडूत ८९ धावांची खेळी केली. फलंदाजीने सुरूवात करताना साहा आणि गिलने पहिल्या विकेटसाठी २९ धावांची भागीदारी केली. साहा ११ धावा करत बाद झाला पण शुबमन गिल ८९ धावांची नाबाद परतला. विलियमसनने गिलला चांगली साथ देत २६ धावा केल्या पण तोही मोठी खेळी न करता झेलबाद झाला. विजय शंकरलाही ८ चेंडूत रबाडाने तंबूत धाडले. त्यानंतर आलेल्या राहुल तेवतियाने ८ चेंडूत २३ धावांची वादळी खेळी करत गिलसोबत संघाचा डाव १९९ पर्यंत नेला. पंजाबकडून कागिसो रबाडाने २ विकेट्स मिळवल्या. त्याच्याशिवाय हरप्रीत ब्रार आणि हर्षल पटेल यांनी प्रत्येकी १ विकेट मिळवली.